## ॥ रेष ॥

मराठी भाषा ही नानाविध अलंकारांनी सजलेली आहे. आणि तिच्या त्या प्रत्येक अलंकाराचे महत्त्व आपण वारंवार अनुभवतो. अलंकार ह्यासाठी कि त्यामुळे त्या भाषेचे सौंदर्य द्विगुणीत होते. एखादी सुंदर स्त्री ही दागिन्यांमुळे अधिकच सुंदर दिसते तशीच त्या भाषेतील अलंकार म्हणजे चिन्हांनी सुशोभीत होते. अनुस्वार, स्वल्पविराम, विराम, उद्गार वाचक, प्रश्नार्थक चिन्ह, ही आणि अशी बरीच!! तर त्यापैकी एक असणाऱ्या रेफ बद्दल पाहू!

अक्षरांवर रेफ ही त्या वाक्यांचं, अक्षरांचं सौंदर्य खुलविते. जशी धरंदाज स्त्री, दागदागिने घालून शालू नेसून, अदबीने डोक्यावर पदर घेते तशीच अक्षरांवरील "रेफ" मला वाटते. एवढेच नाही तर कपाळावर आली की आपण तिचे नाव बदलून आठ्या म्हणतो. ती चिठ्ठी किंवा भाग्याची खूण, तळहातावर भविष्य, नशीब पाहणे, सांगणारी, जमिनीवर आखलेले ते दोन तुकडे सांगणारे, विभाजन! आणि नात्यामधली लकीर ही दुही निर्माण करणार.

आपल्या आयुष्याची डायरी जरी परमेश्वराने लिहिलेली असली तरी वाचणार मात्र आपणच असतो. असं म्हणतात, जन्मापूर्वीच आपल्या कपाळावरील रेषांमध्ये आपलं भविष्य लिहून आपल्याला पाठवलं असतं.

तर अशी ही "रेष" — कधीच दुर्लक्षीत करू नका, आयुष्यात, जीवनात महत्त्वाची आहे. मराठी भाषेतील सगळीच चिन्हे आपल्याला काही शिकवत असतात. आणि ही मराठीची खासियत आहे.

सौ. उज्वला श्रीराम प्रभुणे.